2 9 MAR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संजय डी. पाटील यांचा शिवगौरव, तर लाटकर यांचा 'शिवसेवा'ने सन्मान

## भोंदूंच्या अंधश्रद्धेमुळे पुरोगामी विचार मागे : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात शनिवारी खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते डॉ. संजय डी. पाटील आणि भरत लाटकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**कोल्हापूर :** भोंदूबाबांच्या अंधश्रद्धाजन्य प्रथांमुळे पुरोगामी महाराष्ट्रात राजर्षी छत्रपती शाहू महाराज, जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव कमी होत असल्याची खंत अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या राज्य अध्यक्षा सरोज पाटील यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठअंतर्गत आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा, कृती समितीतर्फे आयोजित 'शिव महोत्सव' कार्यक्रमात त्या बोलत होत्या. शनिवारी झालेल्या या कार्यक्रमात खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांना 'शिवगौरव' पुरस्कार आणि नगरसेवक भरत लाटकर यांना 'शिवसेवा' पुरस्कार देऊन सन्मानित केले.

सरोज पाटील म्हणाल्या, देव माणसांतच आहे; त्यामुळे भोंदूबाबांच्या मागे लागण्यापेक्षा समाजकार्यात योगदान देणे आवश्यक आहे. आभासी जगाच्या वाढत्या प्रभावामुळे तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त करत मोबाइलचा अतिरेक टाळण्याचे आणि पत्रिकांवर अवलंबून राहू नये, असेही आवाहन त्यांनी केले.

भरत लाटकर यांनी, राष्ट्रसेवा दलाच्या कार्यातून देशसेवेची प्रेरणा मिळते, असे सांगत तरुणांनी रोज किमान एक तास देशासाठी देण्याचे आवाहन केले. शैक्षणिक क्षेत्रातील २० जणांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. कृती समितीचे अध्यक्ष मंजित माने यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास गायक आनंद शिंदे, उत्कर्ष शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे, नगरसेवक आदिल फरास, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रा. रघुनाथ ढमकले, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पोवार, डॉ. सरदार जाधव, डॉ. प्रवीण कोडोलीकर, योगिता कोडोलीकर, विश्वजित वाडकर, नितेश गणेशाचार्य, अक्षय मोरे, डॉ. कपिल राजहंस उपस्थित होते. उपाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी स्वागत, तर सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले.

2 9 MAR 2026
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिव-जीवन गौरव पुरस्काराने डॉ. संजय डी. पाटील सन्मानित

## शिवाजी विद्यापीठात 'शिव महोत्सव' उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीच्या वतीने आयोजित २१ व्या भव्य 'शिव महोत्सव २०२६' शनिवारी सायंकाळी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात उत्साहात पार पडला. या सोहळ्यात डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मानाचा 'शिव-जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्याध्यक्ष सरोज पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले, तर खा. शाहू छत्रपती महाराज यांनी अध्यक्षपद भूषवले.



डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना शिव-जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करताना मान्यवर. (छाया : पांडुरंग पाटील)

यावेळी डॉ. संजय डी. पाटील यांच्यासोबतच भरत लाटकर यांना 'शिव-सेवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले, तर अनिल लवेकर यांचा अमृत महोत्सवानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी सरोज पाटील यांनी अंधश्रद्धांना बळी न पडण्याचे अवाहन केले, तर 'शिंदेशाही'कार्यक्रमामुळे सभागृहात चैतन्य पसरले होते. सार्थक क्रिएशन्सच्या वतीने सादर करण्यात आलेल्या लोककलेच्या आविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहमेळाव्याला नगरसेवक आदिल फरास, शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजयसिंह जाधव, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रा. रघुनाथ ढमकले, सायरस पूनावाला इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य डॉ. सरदार जाधव, योगिता कडोलीकर आदी उपस्थित होते. प्रवर्तक डॉ. प्रवीण कोडोलीकर, मंजीत माने आणि शुभम शिरहट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन समितीने या सोहळ्याचे नेटके नियोजन केले होते. आजी-माजी विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व गर्दीमुळे विद्यापीठाचा परिसर सांस्कृतिक रंगात न्हाऊन निघाला होता.

29 MAR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरोगामी महाराष्ट्रात बुवाबाजी चिंताजनक

## सरोज पाटील; शिवमहोत्सवात डॉ. संजय डी. पाटील यांना शिव-जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुरोगामी महाराष्ट्रात महिला बुवाबाजीला बळी पडतात, ही बाब चिंताजनक आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र नेमका कोणत्या दिशेने जात आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्याध्यक्ष सरोज पाटील (माई) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीच्या वतीने शनिवारी शिवाजी विद्यापीठ येथील राजमाता जिजाऊ सभागृह येथे 'शिवमहोत्सव २०२६'चे आयोजन केले होते. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना शिव-जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी त्या बोलत होत्या. खासदार शाहू महाराज अध्यक्षस्थानी होते.

सरोज पाटील म्हणाल्या, देव माणसात असतो, हे सर्वांनी समजले पाहिजे. जात-पात आणि पत्रिका पाहू नये. जादूटोणा, कर्मकांडापासून दूर राहावे. हे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम तरुणांचे आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात कृती समितीतर्फे खा. शाहू महाराज यांच्या हस्ते डॉ. संजय डी. पाटील यांना शिव-जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. (छाया : मिलन मकानदार)



शिवमहोत्सवात शिंदेशाही कार्यक्रमात गीत सादर करताना उत्कर्ष शिंदे.

### भरत लाटकर यांना शिवसेना पुरस्कार

राष्ट्र सेवा दलाचे भरत लाटकर यांना शिवसेवा पुरस्कार, तर शासकीय कर्मचारी संघटनेचे अनिल लवेकर यांचा पंचाहत्तरीनिमित्त विशेष सत्कार करण्यात आला. यासह २० जणांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### शिंदेशाहीच्या तालावर तरुणाई थिरकली

शिवमहोत्सवामध्ये 'शिंदेशाही' कार्यक्रमात महाराष्ट्राचे लोकप्रिय गायक आनंद शिंदे आणि गायक उत्कर्ष शिंदे यांच्या गीतांवर तरुणाई थिरकली.

भरत लाटकर यांनी मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी स्वागत केले. सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. महोत्सवाचे अध्यक्ष मंजित माने यांनी आभार मानले. संकल्पक डॉ. प्रवीण कोडोलीकर, विरोधी पक्षनेते राजू लाटकर, नगरसेवक आदिल फरास, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजयसिंह जाधव, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सायरस पूनावाला इंटरनॅशनल स्कूलचे सरदार जाधव, योगिता कोडोलीकर उपस्थित होते.

29 MAR 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पवार इतिहास संशोधन व लेखन जीवनकार्य म्हणून करत

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर :** डॉ. जयसिंगराव पवार इतिहासाचे संशोधन आणि लेखन हे आपले जीवनकार्य म्हणून अखंड संशोधन करीत होते. डॉ. पवार प्रमाण इतिहास लिहिणारे इतिहासकार होते. त्यादृष्टीने त्यांनी संपूर्ण आयुष्यभर वाटचाल केलेली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक म्हणून त्यांनी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. संशोधन केंद्रामध्ये त्यांनी भरीव योगदान दिले आहे. इतिहासामध्ये जे घडले आहे ते प्रामाणिकपणे पुराव्यानिशी लोकांपर्यंत मांडणारे ते मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या दुःखद निधनामुळे इतिहासाचे, शिवाजी विद्यापीठाचे न भरून येणारे नुकसान झाले आहे, असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शुक्रवारी आयोजित शोकसभेत त्या बोलत होत्या.

इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील म्हणाले, डॉ. पवार दस्तऐवजांना महत्त्व देणारे, वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी करणारे मान्यताप्राप्त इतिहासकार होते. आवश्यक तेव्हा इतिहाससंदर्भातील घडामोडींबाबत निर्णायक मत व्यक्त करीत होते. डॉ. पवार यांनी व्यक्त केलेल्या मताला संपूर्ण महाराष्ट्रात महत्त्वाचे स्थान होते.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे यांनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य अमरसिंग रजपूत, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, इतिहासप्रेमी जनता, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

9 MAR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पवार यांच्या निधनाने विद्यापीठाची हानी

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांचे प्रतिपादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

डॉ. जयसिंगराव पवार इतिहासाचे संशोधन आणि लेखन हे आपले जीवनकार्य म्हणून अखंड संशोधन करीत होते. डॉ. पवार प्रमाण इतिहास लिहिणारे इतिहासकार होते. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक म्हणून त्यांनी अत्यंत महत्वाची जबाबदारी पार पाडली. संशोधन केंद्रामध्ये त्यांनी भरीव योगदान दिलेले आहे. इतिहासामध्ये जे घडले आहे, ते प्रामाणिकपणे पुराव्यानिशी लोकांपर्यंत मांडणारे मूर्तीमंत उदाहरण होते. त्यांच्या निधनामुळे इतिहासाचे, शिवाजी विद्यापीठाचे न भरून येणारी हानी झालेली आहे, असे भावोद्गार शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र- कुलगुरु डॉ. ज्योती जाधव यांनी काढले.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या शोकसभेत बोलताना प्रभारी प्र– कुलगुरु डॉ.ज्योती जाधव.**

डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शुक्रवारी शोकसभेचे आयोजन केले होते. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील म्हणाले, डॉ. पवार दस्तऐवजांना महत्व देणारे, वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी करणारे मान्यता प्राप्त इतिहासकार होते. आवश्यक तेव्हा इतिहाससंदर्भातील घडामोडींबाबत निर्णायक मत व्यक्त करीत होते. डॉ. पवार यांनी व्यक्त केलेल्या मताला संपूर्ण महाराष्ट्र राज्यात महत्वाचे स्थान होते. इतिहासाच्या क्षेत्रामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांनी इतिहासाचा वारसा पुढे नेणे ही मोठी जबाबदारी आहे. त्यांचे एक-एक ग्रंथ हे स्वतंत्र प्रकल्प असल्याचे समोर आलेले आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे यांनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य अमरसिंग रजपूत, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, इतिहासप्रेमी जनता, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी डॉ. जयसिंगराव पवार यांना आदरांजली वाहिली.

2 9 MAR 2026

लोकमत

# जयसिंगराव पवार पुराव्यानिशी इतिहास उलगडत : ज्योती जाधव

## शिवाजी विद्यापीठासह विविध संस्थांतर्फे श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. जयसिंगराव पवार इतिहासाचे संशोधन आणि लेखन हे आपले जीवनकार्य म्हणून अखंड संशोधन करीत होते. ते प्रमाण इतिहास लिहिणारे आणि प्रामाणिकपणे पुराव्यानिशी लोकांपर्यंत इतिहास मांडणारे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या निधनामुळे इतिहासाची, शिवाजी विद्यापीठाची न भरून येणारी हानी झालेली आहे, असे प्रतिपादन प्रकुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी डॉ. पवार यांना श्रद्धांजली वाहताना केले. दरम्यान, विविध संस्थांतर्फे डॉ. पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील म्हणाले, इतिहासाच्या क्षेत्रामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांनी डॉ. पवार यांचा वारसा पुढे नेणे ही मोठी जबाबदारी आहे. त्यांचे एक एक ग्रंथ हे स्वतंत्र प्रकल्प आहेत. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे, अमरसिंग रजपूत यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

## बागल विद्यापीठातर्फे श्रद्धांजली

भाई माधवराव बागल विद्यापीठाचे ज्येष्ठ मार्गदर्शक विश्वस्त डॉ. पवार यांना संस्थेचे अध्यक्ष ॲड. अशोकराव साळोखे, कार्याध्यक्ष डॉ. टी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत बागल विद्यापीठात श्रद्धांजली वाहण्यात आली. या शोकसभेला विश्वस्त रवी जाधव, संभाजीराव जगदाळे, तनुजा शिपुरकर, जितेंद्र कांबळे, चंद्रकांत यादव, ॲड. अनिल घाटगे, शंकर काटाळे, आनंदा सलगर, परशराम माने उपस्थित होते.

## मुस्लीम बोर्डिंगतर्फे श्रद्धांजली

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. पवार यांना मुस्लीम बोर्डिंगतर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांच्या अंत्ययात्रेदरम्यान दसरा चौकात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्याजवळ चेअरमन गणी आजरेकर आणि प्रशासक कादर मलबारी यांच्या हस्ते पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी संचालक लियाकत मुजावर, जहांगीर अत्तार, रफीक शेख, रफीक मुल्ला, हाजी चांदभाई जमादे, बापूसो मुल्ला, मुख्याध्यापक सय्यद अस्लम काझी उपस्थित होते.